**नि.दि.मु.नं.५५/२०१३ मधील मधील नि.५ वरील आदेश**
( घोषित ता. १४/०६/२०१३)

अर्जाचे व म्हणण्याचे स्वरूप

**१.** वादींचा नि.५ चा अर्ज वाचला.

**२.** वादींनी सदरचा अर्ज प्रतिवादी नं. ८ विरुध्द त्याने अगर त्याच्यातर्फे इसमांनी वादींचे दावा मिळकतीतील सामाईक मालकी हक्काच्या शांततामय कब्जा वहिवाटीला कोणत्याही प्रकारे हरकत व अडथळा करु नये तसेच त्याने दावा मिळकतीवर कोणताही बोजा निर्माण करू नये अगर कोणत्याही प्रकारे दावा मिळकत हस्तांतर करू नये अशी तुर्तातूर्त मनाई मागितली आहे.

**३.** दावा अर्जी कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही दावा मिळकत आहे. वादींचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी नं. १ ही वादी नं. १ ची सून व प्रतिवादी नं. ५ ची पत्नी आहे. प्रतिवादी नं. २ ते ४ ही प्रतिवादी नं. १ ची मुले आहेत. दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी नं. ५ ते ७ यांची समाईकात प्रत्यक्ष कब्जा वहिवाट आहे. प्रतिवादी नं. १ ही प्रतिवादी नं. ५ यांचेकडे पर्यायाने वादींकडे नांदत नाही. त्यांचे संबध वाकूडपणाचे आहेत. सदर दावा मिळकत तसेच कुदनूर येथील इतर जमिन व घर मिळकती संदर्भात वाटप होवून मिळणेकरीता व स्वतंत्र कब्जा मिळणेकरीता वादी व प्रतिवादी नं. ५ ते ७ यांनी अन्य भाऊबंदाबरोबर चंदगड येथील दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात रे.क.नं. १४९/१९९२ चा दावा दाखल केलेला होता. सदर दावेत यातील प्रतिवादी नं. ५ हा वादी म्हणून होता व त्यानेच दावा दाखल केला होता. परंतू वादीतर्फे वटमुखत्यार म्हणून सुरुवातीपासून प्रतिवादी नं. ५ चा मामा, वादी नं. १ चा सख्खा भाऊ व प्रतिवादी नं. १ चे वडील श्री. मारुती अर्जुन भिकले, रा. हडलगे, ता. गडहिंग्लज हे प्रत्यक्ष काम पहात होते. सदर दावेत मूळ वादीचे वटमुखत्यार म्हणून असलेल्या श्री. मारुती अर्जुन भिकले यांनी सदर दावेतील प्रतिवादी नं. ६ यांचेशी संगनमत करुन दावा मिळकतीतील हिस्सा हडप करण्याच्या हेतूने दावा चालविणेचे नाकारले. त्यामुळे रे.क.नं. १४९/१९९२ चा दावा हा पुढे प्रस्तुत वादी नं. १ ते ३ यांनी चालविला व ता. २७/११/२००९ इ. रोजी तो दावा मंजूर होवून निकाली झाला. सदर दावेत वादी तसेच प्रतिवादी नं. ५ ते ७ यांना प्रत्येकी समान हिस्सा देणेत आला आहे. रे.क.नं. १४९/१९९२ या दावेतील झाले निकालावर मा. जिल्हा न्यायाधीश—१ गडहिंग्लज, यांचे न्यायालयात रे.दिवाणी अपील नं. १०/२०१० हे आता प्रलंबीत असून, त्याचा अद्याप निकाल लागलेला नाही. याची कल्पना यातील वादी व प्रतिवादी नं. १ ते ७ यांनी होती व आहे.

४ वादींचे पुढे असे म्हणणे आहे की, वादी नं. १ चे पती व वादी नं. २ व ३ चे वडील कै. गणपती संतू आंबेवाडकर हे मयत झालेनंतर फेरफार क्र. ९२७ प्रमाणे सर्व वारसांची नांवे ७/१२ पत्रकी नोंद झाली. सदर दावेतील प्रतिवादी नं. १ ही कायमपणे हडलगे येथे बापाच्या घरी प्रतिवादी नं. २ ते ४ यांचे समवेत रहात असते. प्रतिवादी नं. १ ते ५ यांचे दरम्यान वैवाहिक वाद निर्माण झाल्याचा भास करुन प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी प्रतिवादी नं. १ यांचे वडील श्री. मारुती अर्जुन भिकले (प्रतिवादी नं. ५ चे वटमुखत्यार) यांचे सांगणेवरुन प्रतिवादी नं. ५ चे नांव दावा मिळकतीचे ७/१२ पत्रकी नोंद असलेचा गैरफायदा घेवून गडहिंग्लज येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर यांचे कोर्टात रे. मुकदमा नं. १६५/२००४ चा पोटगी ठरवून मिळणेकरीता हिंदू मेंटेनन्स व ॲडॉप्शन ॲक्ट प्रमाणे दावा दाखल करुन त्यामध्ये ता. २७/११/२००४ रोजी आपसात तडजोडीचा हुकूमनामा करुन घेतलेचे वादींना फेरफार उतारे काढून पाहिले असता समजून आले आहे. सदरच्या हुकूमनामेत दाखविलेले प्रतिवादी नं. ५ यांचे नांवचे क्षेत्र हे दावा मिळकतीत मिळणा—या प्रतिवादी नं. ५ यांच्या कायदेशीर हिश्यापेक्षा अधिक दाखविलेले आहे. तसेच रे.क्र. नं. १४९/१९९२ हा वाटपाचा दावा प्रलंबीत असून, त्यामध्ये हिस्से ठरलेले नाहीत याची माहिती असताना सदरची गोष्ट मे. कोर्टापासून हेतुपूरस्कररित्या लपवून ठेवून प्रतिवादी नं. ५ चा मालकी हक्क नसलेल्या क्षेत्राचा सुध्दा समावेश करुन खोटा व बनावट हुकूमनामा कोर्टाची दिशाभूल करुन त्यांनी मिळविलेला आहे. रे.क्र.नं. १६५/२००४ चे दावेत वादींना अगर प्रतिवादी नं. ६ व ७ यांना आवश्यक पक्षकार केलेले नव्हते व नाही. त्यामुळे रे.क्र.नं. १६५/२००४ चा ता. २७/११/२००४ इ. रोजी झालेला निकाल व हुकूमनामा वादींच्यावर अगर प्रतिवादी नं. ६ व ७ यांचेवर मुळीच बंधनकारक नाही. अशी परिस्थिती असताना अद्याप वादी प्रतिवादींच्यात सरस निरस मानाने वाटण्या झालेल्या नसताना सदर दावेतील प्रतिवादी नं. १ हिने अ.पा.क म्हणून प्रतिवादी नं. २ ते ४ यांचेवतीने दावा मिळकतीचे ता. ३१/१२/२०१२ इ. रोजीचे तथाकथीत रजि. नोंद खूष खरेदीपत्र प्रतिवादी नं. ८ याचे नावे करून दिल्याचे ता. ७/३/२०१३ इ. रोजी वादींना समजून आले. त्याच दिवशी प्रस्तुत वादींनी अर्ज देवून ता. ३१/१२/२०१२ च्या खरेदीपत्राची सहिशिक्याची झेरॉक्स प्रत मिळविली व अनुषंगीक कागदपत्रे काढून पाहिली असता दावा मिळकतीचे रजि. खरेदीपत्र झालेचे प्रस्तुत वादींना समजून आलेले आहे. सदरचे खरेदीपत्र हे वादींच्यावर मुळीच बंधनकारक नाही. दावा मिळकतीतील प्रत्यक्ष कब्जा सदर खरेदीपत्राने प्रतिवादी नं. ८ यांना मुळीच गेलेला नाही.

५ वादींचे पुढे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी नं. ८ यांनी ता. ३१/१२/२०१२ इ. रोजी करुन घेतले खरेदीखतानंतर त्यांचा अंमल ७/१२ पत्रकी करुन घेवून आवश्यक फेरफार क्र. १४४७ मंजूर करुन घेतला आहे. सदर प्रतिवादी नं. ८ यास सर्व परिस्थिती माहीती असताना देखील त्याने ता. ३१/१२/२०१२ चे तथाकथीत खरेदीपत्राचा कागद करुन घेतलेचे दिसून येते. सदर प्रतिवादी नं. ८ हा ता. २२/३/२०१३ रोजी दावा मिळकतीतील स.नं. ३० मध्ये येवून सर्व्हे नं. ३० पैकी व इतर मिळकतीतील हिस्सा रजि. खरेदीपत्राने घेतलेचे सांगून बेकायदेशिररित्या जमिनीत घुसणेचा प्रयत्न करुन वादींना हरकत व अडथळा करू लागला. त्यामुळे वरील सर्व कारणामुळे सदरचा अर्ज वादींना दाखल करणे भाग पडले आहे.

वादींना प्रथमदर्शनी केस आहे. तसेच दाव्याचा समतोलत्व देखील त्यांच्याच बाजूने आहे. वादींना प्रतिवादी नं. ८ विरूध्द तुर्तातुर्त मनाई ताकीद न मिळाल्यास त्यांचे अपरिमीत नुकसान होणार आहे. सबब, वादींचा अर्ज मंजूर करणेत यावा.

**६.** प्रतिवादी नं. ८ ने आपले म्हणणे नि. २६ कडे देवून सदर अर्जातील विधाने ही चुकीची असल्याने नाकबूल केले आहे. प्रतिवादी नं. ८ चे असे म्हणणे आहे की, ता. ३१/१२/२०१२ रोजी त्याने दावा मिळकतीतील नमुद जमीनी या खरेदीपत्राप्रमाणे खरेदी करून घेतल्या आहेत. तेव्हापासून प्रस्तुत प्रतिवादी खरेदीपत्रात नमूद केलेल्या जमिनी मालक नात्याने वहिवाटीस आहे. दावा तारखेस संपूर्ण दावा मिळकतीत यातील वादींची प्रत्यक्ष कब्जा वहिवाट कधीही नव्हती. वादींनी सत्य परिस्थिती लपवून प्रस्तुत प्रतिवादीविरुध्द तुर्तातूर्त मनाई घेणेची खटपट चालविली आहे. प्रस्तुत प्रतिवादी विरुध्द तुर्तातूर्त मनाई दिलेस प्रस्तुत प्रतिवादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. तसेच प्रथमदर्शनी केस व सोयीचे समतोलत्व प्रतिवादीच्या बाजूने आहे. या सर्व कारणांचा विचार होवून वादींचा सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा.

## युक्तीवाद

**७.** वादींकरीता विद्वान वकील श्री. एन. जी आजरेकर तसेच प्रतिवादींकरीता विद्वान वकील श्री. एस.आर. पाटील यांचा युक्तीवाद ऐकला. त्या दोघांनी आपल्या अर्जाच्या व त्यातील म्हणण्याच्या व दाखल कागदपत्रांच्या अनुषंगाने युक्तिवाद केलेला आहे. तो स्वतंत्रपणे उध्दृत करण्याची आवश्यकता नाही.

## मुद्दे व उत्तरे

**८.** वादी व प्रतिवादी यांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे विचारार्थ उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यावरील माझी उत्तरे त्याखाली नमुद केलेल्या कारणासाठी पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

| | मुद्दे | उत्तरे |
|---|---|---|
| १. | वादी मागतात तशी तुर्तातुर्त मनाई मिळणेस सकृतदर्शनी स्थिती असल्याचे ते शाबीत करतात काय?. | .... होकारार्थी |
| २. | वादी मागतात तशी तुर्तातुर्त मनाई मिळणेस सोईचे समतोलत्व त्यांच्या बाजूने असल्याचे ते शाबीत करतात काय? | .... होकारार्थी |
| ३. | वादी मागतात तशी तुर्तातुर्त मनाई नाकारलेस त्यांचे पैशाने भरुन न येणारे नुकसान होईल असे ते शाबीत करतात काय? | .... होकारार्थी |

४. काय आदेश? ...अर्ज मंजूर
अंतिम आदेशाप्रमाणे.

## मुद्दा क्र. १ ते ३ संबंधी कारणमिमांसा

**९.** वादींनी दावा मिळकत सर्व्हे नं. ३० चा सन २००५—२००६ ते २०११—२०१२ पर्यंतच्या ७/१२ उता—याची प्रत, दावा मिळकत सर्व्हे नं. ३१ चा सन २००५—२००६ ते २०११—२०१२ पर्यंतच्या ७/१२ उता—याची प्रत, दावा मिळकत सर्व्हे नं. ३२ चा सन २००५—२००६ ते २०११—२०१२ पर्यंतच्या ७/१२ उता—याची प्रत, दावा मिळकत सर्व्हे नं. २५/२ चा सन २००५—२००६ ते २०११—२०१२ पर्यंतच्या ७/१२ उता—याची प्रत, रे.क.नं. १४९/९२ मधील हुकुमनाम्याची प्रत, रे.क.नं. १६५/२००४ मधील आपसात हुकुमनाम्याची प्रत, दावा मिळकतीचे दि. ३१/१२/२०१२ रोजीचे प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी प्रतिवादी नं. ८ च्या नावे करून दिलेले खरेदीपत्र प्रत, फेरफार क्र. १४४७ चा उतारा, गडहिंग्लज येथील मा. जिल्हा न्यायाधीश — १, यांच्या न्यायालयात दाखल केलेल्या नियमीत अपील नं. १०/१० ची प्रत, फेरफार क्र. १३४८ ची प्रत, रे.क.नं. १४९/९२ या दाव्यातील निशाणी ५ व त्यावरील आदेशाची प्रत, सत्याप्पा जरळी यांचे प्रतिज्ञापत्र प्रत, दाखल केले आहे. प्रतिवादी नं. ८ ने देखील दावा मिळकत सर्व्हे नं. २५/२ चा सन २००५—२००६ ते २०१२—२०१३ पर्यंतच्या ७/१२ उता—याची प्रत, दावा मिळकत सर्व्हे नं. ३० चा सन २००५—२००६ ते २०१२—२०१३ पर्यंतच्या ७/१२ उता—याची प्रत, दावा मिळकत सर्व्हे नं. ३१ चा सन २००५—२००६ ते २०१२—२०१३ पर्यंतच्या ७/१२ उता—याची प्रत, दावा मिळकत सर्व्हे नं. ३२ चा सन २००५—२००६ ते २०१२—२०१३ पर्यंतच्या ७/१२ उता—याची प्रत, फेरफार क्र. १४४७ चा उतारा, खाते क्र. ४०६ चा खतावणी जमाबंदी पत्रक, फेरफार क्र. १३४८ चा उतारा, आनंदा गणपती आंबेवाडकर यांनी यल्लूबाई गणपती आंबेवाडकर हिला लिहून दिलेले पोटगी पत्र दाखल केलेले आहे.

**१०.** मा.मुंबई उच्च न्यायालयाने शामराव गणपत चिंतामणी— वि—काकासाहेब लक्ष्मण गोरडे २००८(२) ऑल एम.आर.११८ यातील न्यायनिवाडयात दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ०१ व ०२ नुसार तूर्तातूर्त ताकीद मंजूर करणेसाठी सकृतदर्शनी स्थिती, सोईचे समतोलत्व व एखाद्याचे न भरुन येणारे नुकसान या गोष्टी लक्षात घेणे गरजेचे असल्याबाबत मत व्यक्त केले आहे. प्रस्तुत प्रकरणात वादींनी प्रतिवादी नं. ८ विरुध्द तूर्तातूर्त ताकीद मंजूर करणेची विनंती केली आहे.

**११.** वादीच्या वकीलांनी खालील न्यायनिवाडयावर भिस्त ठेवलेली आहे. बालसुब्रमण्यम व इतर वि. नागलिंगम (ए.आय.आर. १९९६ मद्रास १४६) यातील न्यायनिवाडयात मा. मद्रास उच्च न्यायालयाने एखादी सामाईक मालमत्तेसंदर्भात वाटपाचा दावा जर प्रलंबित असेल व सहमालकांनी खरेदीदाराविरूध्द त्यांच्या दावा मिळकतीतील सामाईक ताब्यास हरकत करू

नये अशी दाद मागितलेली असेल व खरेदीदार त्याचा ताबा सिध्द करण्यास असफल ठरला असल्यास सहमालकांना खरेदीदाराविरूध्द तुर्तातुर्त मनाई ही देता येईल. २. रामदास वि. सिताबाई व इतर (२००९ ऑल एस.सी.आर. १३६८) यातील न्यायनिवाडयात मा. सर्वोच्च न्यायालयाने एखादया सामाईक मालमत्तेतील सहमालकाचा हिस्सा तो सहमालक विकू शकतो परंतू खरेदीदारास त्यानुसार ताबा हा मालमत्तेत सरस निरस मानाने वाटप झाल्याशिवाय प्राप्त होत नाही. त्यामुळे वाटपाचा दावा केल्याशिवाय सदर खरेदीदारास ताब्याचा अधिकार प्राप्त होत नाही.

**१२.** प्रतिवादी नं. ८ तर्फे वकीलांनी खालील न्यायनिवाडयावर भिस्त ठेवली आहे. १. सिमा अर्शद जहीर व इतर वि. महानगरपालिका ग्रेटर मुंबई (२००६(५)महा.लॉ.जर्नल पा.नं. २१८) यातील न्यायनिवाडयात मा. सर्वोच्च न्यायालयाने प्रथमदर्शनी केस, सोईचे समतोलत्व, होणारे नुकसान न भरून येणारे असेल त्यासोबतच वादी हा स्वच्छ हाताने न्यायालयात आलेला असेल तरच मान्य करण्यात यावे असे मत नोंदविले आहे. २. हरचरणजितसिंग थिंड वि. दिक्षा थिंड व इतर (२००६(५)महा.लॉ जर्नल पा.नं. ५८७) यातील न्यायनिवाडयात मा. मुंबई उच्च न्यायालयाने जर एखादया व्यक्तिने काही गोष्टी लपवून ठेवलेल्या असतील तर त्याच्या हक्कात तुर्तातुर्त मनाई हुकूम हा देता येणार नाही असे मत व्यक्त केले आहे.

**१३.** हे प्रस्थापित आहे की, मिळकती संदर्भात करण्यात आलेले फेरफार किंवा मिळकतीचे सातबारा पत्रकी करण्यात आलेल्या नोंदी या महसूल गोळा करण्याच्या हेतूने करण्यात आलेले असतात. सदरच्या नोंदी ज्या मिळकती संबंधात व ज्या व्यक्तीच्या लाभात करण्यात आलेल्या असतात त्या व्यक्तीस त्या नोंदीमुळे सदर मिळकती संदर्भात कसलाही कायदेशीर अधिकार, मालकी किंवा हक्क मिळू शकत नाही अगर असा कायदेशीर अधिकार, मालकी किंवा हक्क दर्शविण्यासाठी त्या नोंदींचा उपयोगही होवू शकत नाही. प्रस्तुत प्रकरणातील अर्ज तसेच रेकॉर्डवर दोन्ही बाजूने दाखल केलेले दावा मिळकती संदर्भातील ७/१२ उतारे व इतर कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, दावा मिळकतीत प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या नावाची नोंद फेरफार क्र. १३४८ नुसार मा.गडहिंग्लज येथील दिवाणी न्यायालय, व.स्तर यांचेकडील रे.क.नं. १६५/२००४ मधील हुकुमनाम्यानुसार नोंदविल्याचे दिसून येते. तसेच त्यानंतर दावा मिळकतीचे खरेदीपत्र हे प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी प्रतिवादी नं. ८ च्या हक्कात करून दिलेले आहे. त्यानुसार फेरफार क्र. १४४७ प्रमाणे प्रतिवादी नं. ८ चे नाव दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी भोगवटदार व जमिन करणा—याचे नाव या रकान्यात नोंद झाल्याचे दिसून येते. परंतु, असे असले तरी एक बाब स्पष्ट होते की, वादी, प्रतिवादी नं. ५ ते ७ व त्यांचे भाउबंद यांच्यामध्ये या न्यायालयात यापूर्वी रे.क.नं. १४९/९२ हा दावा वाटपाचा, हक्कज्ञापनाचा व कायम मनाईचा दाखल होता. तो दावा दि. २७/०९/२००९ रोजी मंजूर होवून त्यामध्ये निकाल झाला. त्यातील निकालानुसार सध्याच्या दाव्यातील वादी व प्रतिवादी क्र. ५ ते ७ यांचा दावा मिळकतीमध्ये १/६ एवढा हिस्सा असल्याचे घोषीत करण्यात आले होते. परंतु, त्यातील निकालाविरूध्द प्रतिवादी क्र. ५ आनंदा गणपती आंबेवाडकर यांनी मा. गडहिंग्लज येथील जिल्हा न्यायाधीश क्र—१ यांच्या न्यायालयात नियमीत दिवाणी अपील नं. १०/२०१० हे दाखल केल्याचे

दाखल कागदपत्र पाहता दिसून येते. त्यामुळे दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी नं. ५ ते ७ यांच्या सामाईकात व प्रत्यक्ष कब्जा वहीवाटीस असल्याचे दिसून येते.

**१४.** जरी प्रतिवादी नं. ५ याची पत्नी व त्याची मुले म्हणजेच प्रतिवादी नं. १ ते ४ यांचीही नावे दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी गडहिंग्लज येथील दिवाणी न्यायाधीश,व.स्तर यांचेकडील रे.क.नं. १६५/२००४ मध्ये निकालानुसार व फेरफार क्र. १३४८ नुसार नोंद झाल्याचे दिसून येत असले तरी, रेकॉर्डवर दाखल रे.क.नं. १६५/२००४ चे निकालपत्र व या न्यायालयातील रे.क.नं. १४९/९२ मधील हुकुमनामा पाहता रे.क.नं. १६५/२००४ मध्ये प्रतिवादी नं. ५ याला दावा मिळकतीत रे.क.नं. १४९/१९९२ मध्ये मिळालेल्या किंवा त्याला प्राप्त होणा—या कायदेशीर हिश्यापेक्षा अधिक हिश्याचे क्षेत्र दाखवून त्याप्रमाणे आदेश पारीत झाल्याचा दिसून येतो. म्हणजेच रे.क.नं. १४९/९२ मधील आदेशानुसार प्रतिवादी नं. ५ याच्या असलेल्या कायदेशीर हिश्यापेक्षा अधिक हिश्याचे क्षेत्र रे.क.नं. १६५/२००४ मध्ये दर्शविलेले आहे. तसेच रे.क.नं. १४९/१९९२ हा दावा प्रलंबित असताना नंतर रे.क.नं. १६५/२००४ गडहिंग्लज येथील दिवाणी न्यायाधीश,व.स्तर यांच्या न्यायालयात दाखल केल्याचे दिसून येते. सदरच्या रे.क.नं. १६५/२००४ मध्ये कोठेही रे.क.नं. १४९/१९९२ प्रलंबित असल्याबाबत अगर वादी व प्रतिवादी नं. ५ ते ७ यांच्यात अदयाप सरस निरस मानाने वाटप झाले नसल्याबाबत कांहीही उल्लेख दिसून येत नाही.

**१५.** तसेच संपूर्ण प्रकरण पाहता प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी प्रतिवादी नं. ८ ला दावा मिळकतीतील त्यांच्या हिश्याला नोंद असलेली जमिन खरेदीपत्राने विक्री केल्याचे दिसत असले तरी, रे.क.नं. १४९/९२ मधील निकालानंतर अद्याप गडहिंग्लज येथे मा. जिल्हा न्यायाधीश – १ यांचे न्यायालयात नियमीत अपिल नं. १०/१० हे प्रलंबीत असल्याने व त्याचा अंतिम निर्णय झाल्याबाबत कोणतेही कागदपत्र अदयाप या कामात दिसून येत नसल्यामुळे वादी व प्रतिवादी नं. ५ ते ७ यांच्यात सरस निरस मानाने वाटप झाल्याबाबत अगर रे.क.नं. १४९/९२ च्या निकालाची अंमलबजावणी झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे दावा मिळकतीसंदर्भातील सर्व कागदपत्रांवरील नोंदी तसेच प्रकरणातील दाखल कागदपत्र पाहता दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी नं. ५ ते ७ यांची एकत्र कुटूंबाची मिळकत असून त्यामध्ये अद्याप सरस निरस मानाने वाटप झालेले नसल्याचे सकृत दर्शनी दिसून येते. त्यामुळे जरी दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी प्रतिवादी नं. ५ च्या वारसांची नांवे नोंद होवून त्यानंतर प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी दावा मिळकतीबाबत प्रतिवादी नं. ८ च्या नावे दि. ३१/१२/१२ रोजी खरेदीपत्र करून दिलेले असले तरी नुसता त्या खरेदीपत्राआधारे प्रतिवादी नं. ८ ला दावा मिळकतीत ताबा मिळाला असे म्हणता येणार नाही. प्रतिवादी नं. ८ ने त्यासाठी वाटपाचा दावा करून दावा मिळकतीचा ताबा मागणे हे गरजेचे आहे. त्यामुळे वादींनी या कामी दाखल केलेले न्यायनिवाडे या कामी लागू होतील असे माझे नम्र मत झाले आहे. तर प्रतिवादी नं. ८ ने या कामी दाखल केलेले न्यायनिवाडे व प्रस्तुत प्रकरणातील तथ्ये ही वेगळी असल्याने ती या कामी लागू होणार नाहीत असे माझे नम्र मत झाले

आहे. तसेच वर उल्लेख केलेल्या मिळकतीच्या नोंदी संदर्भातील कायदेशीर तत्व पाहता, प्रतिवादी नं. ८ चे नांव जरी दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी नोंदलेले दिसत असले तरी दावा मिळकतीसंदर्भात प्रकरण न्यायालयात प्रलंबीत असताना केले गेलेले खरेदीपत्राआधारे प्रतिवादी नं. ८ चा दावा मिळकतीतील ताबा हा प्रथमदर्शनी सिध्द होत नाही. तसेच प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी प्रतिवादी नं. ८ च्या नावे जे दिनांक ३१/१२/१२ रोजी दावा मिळकतीसंदर्भात जे खरेदीपत्र करून दिलेले आहे ते मुळातच प्रतिवादी नं. ५ च्या रे.क.नं. १४९/९२ मधील हुकूमनाम्यानुसार आलेल्या हिश्यापेक्षा जास्त क्षेत्राचे असल्यामुळे प्रतिवादी नं. १ ते ४ यांना प्रतिवादी नं. ५ याला दावा मिळकतीत कायदयाने मिळणा—या हिश्यापेक्षा जास्त क्षेत्राचे खरेदीपत्र कोणाही व्यक्तिस करून देण्याचा कायदेशीर अगर नैतिक अधिकार त्यांना प्राप्त होत नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे प्रतिवादी क्रं. ८ च्या नावाची नोंद जी दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी झाल्याचे दिसून येते ते बेकायदेशीर असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रतिवादी नं. ८ ला दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी त्याच्या नावाची नोंद झाली आहे त्याआधारे दावा मिळकत ही त्याच्याच ताब्यात आहे असे कायद्याने म्हणता येणार नाही.

**१६.** थोडक्यात, वादींच्या बाजुने सकृतदर्शनी स्थिती असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे प्रतिवादी नं. ८ विरुध्द वादींना तात्पुरता मनाई हुकुम मागण्यास सकृतदर्शनी केस असल्याचे शाबीत होते. त्यामुळे दावा मिळकतीत अद्याप वादी व प्रतिवादी नं. ५ ते ७ यांच्यात रे.क.नं. १४९/९२ मधील न्यायनिर्णयाप्रमाणे गडहिंग्लज येथील मा. जिल्हा न्यायाधीश — १ यांच्या न्यायालयात नियमीत अपील नं. १०/१० हे प्रलंबीत असल्यामुळे सरस निरस मानाने वाटप झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपील प्रलंबीत असताना प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी प्रतिवादी नं. ८ च्या नावे दि. ३१/१२/२०१२ रोजी केलेल्या खरेदीपत्रानुसार प्रतिवादी नं. ८ ला दावा मिळकतीचा ताबा दिला असे म्हणता येणार नाही. सद्यस्थितीत वादी व प्रतिवादी नं. १ ते ७ यांचाच दावा मिळकतीत सामाईकात प्रत्यक्ष कब्जा वहिवाट असल्याचे दिसून येते. त्यामुळे नैसर्गिकरित्या वादी मागतात तशी तुर्तातुर्त मनाई मिळणेस सोईचे समतोलत्व त्यांच्या बाजूने असल्याचे निर्विवादपणे शाबीत होते. त्यामुळे वादींच्या व प्र. वादीच्या कायदेशीर अधिकारांचा विचार करुन वादींचे हक्कात तुर्तातुर्त मनाई हुकूम देणे न्यायोचीत होणार आहे. वादी मागतात तशी तुर्तातुर्त मनाई नाकारलेस प्रतिवादी नं. ८ चे जरी काही प्रमाणात नुकसान होणार असले तरी ते निश्चीतच न भरून येण्यासारखे नाही. उलटपक्षी वादी मागतात तशी मनाई न दिलेस त्या जोरावर प्रतिवादी नं. ८ अद्याप वादी व प्रतिवादी नं. १ ते ७ यांच्यात दावा मिळकतीत सरस निरस मानाने वाटप झालेले नसताना वादींच्या प्रतिवादी नं. १ ते ७ यांच्यासह असलेल्या सामाईक प्रत्यक्ष कब्जा वहीवाटीस अडथळा निर्माण करतील. तसेच प्रस्तुतचा दावा तसेच रे.क.नं. १४९/१९९२ मधील न्यायनिर्णयावर केलेले गडहिंग्लज येथील मा.जिल्हा न्यायाधीश — १ यांच्या न्यायालयातील नियमीत अपिल नं. १०/१० प्रलंबीत असताना जर प्रतिवादी नं. ८ ने दावा मिळकतीवर काही बोजा निर्माण केलेस अगर दावा मिळकत ति—हाईत इसमास हस्तांतर केलेस वादी व प्रतिवादी नं. ५ ते ७ यांच्या दावा मिळकतीतील कायदेशीर मालकी व ताब्यास बाधा निर्माण होईल व त्यांचे होणारे नुकसान हे न भरून येण्यासारखे आहे. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ व्दारे या न्यायालयास निहित

करण्यात आलेल्या अंगभूत शक्तीचा वापर करुन वादींचा तुर्तातुर्त मनाई हुकूम संबंधीचा हा अर्ज मंजुर होणे योग्य व न्यायोचित होईल असे माझे ठाम मत आहे. सबब, मुद्‌दा क्र. १ ते ३ चे उत्तर मी होकारार्थी देत आहे. मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. वादींचा नि.नं. ५ चा अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी नं. ८ ने स्वत: अगर ईतर कोणांमार्फत कोणत्याही मार्गाने वादींच्या सामाईक मालकी हक्काचे शांततामय कब्जा वहीवाटीस हरकत व अडथळा करु नये तसेच दावा मिळकतीवर कोणताही बोजा निर्माण करू नये अगर कोणत्याही प्रकारे दावा मिळकत हस्तांतर करू नये अशी दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत त्यांचेविरुध्द तुर्तातुर्त मनाई ताकीद देणेत येत आहे.

३. वादींच्या या अर्जाचा खर्च मूळ वाद खर्चात समाविष्ठ होईल.

( खुले न्यायालयात अधिघोषित )

सही/
**( पि.म.पाटील )**
दिवाणी न्यायाधिश क.स्तर,
चंदगड

चंदगड.
दिनांक : १४/०६/२०१३